| MHSO200023602022 | **नियमित दिवाणी दावा क्र. ६००/२०२२** |
|---|---|

## निशाण क्र. ३३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ ते ५, १५(ब) व १५(क) यांनी त्यांची कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जात प्रतिवादी क्र. ३ ते ५, १५(ब) व १५(क) यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द सदरचा दावा साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरील प्रतिवादी यांना दाव्यातील समन्सची बजावणी दि. १५/१२/२०२२ रोजी झालेली आहे. परंतु, सदरचे प्रतिवादी हे अडाणी, अशिक्षीत असल्याने व त्यांना ज्ञान नसल्यामूळे व जुनी कागदपत्रे वेळेत मिळाली नसल्यामूळे त्यांना कैफीयत दाखल करता आली नाही. कैफीयत देण्याकामी त्यांना सुमारे तीन वर्षांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणूनबुजून केलेला नाही. सदर प्रतिवादींचे प्रस्तुत दावा मिळकतीत मौलीक हक्क गुंतलेले असून सदरचा दावा हा स्थावर मिळकतीसंबंधी आहे. सदर विलंब माफ न झाल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र. ३ ते ५, १५(ब) व १५(क) यांनी कैफीयत देण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**३.** प्रस्तुत अर्जास वादींनी म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खोटा, बनावट व लबाडीचा असून वादी यांना मान्य व कबूल नाही. अर्जात नमूद कारण हे चुकीचे व दिशाभूल करणारे आहे. प्रतिवादी यांनी जाणूनबुजून दावा प्रलंबित ठेवण्याकरीता तसेच न्यायालयीन कामकाजामध्ये विलंब करण्याकरीता वेळेत कैफीयत दाखल केलेली नाही. प्रतिवादी ही सुशिक्षीत असून त्यांनी इंग्रजीमध्ये सही केलेली आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द सदरचा दावा साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जात सदरील प्रतिवादी यांना दाव्यातील समन्सची बजावणी दि. १५/१२/२०२२ रोजी झालेली असून सदरचे प्रतिवादी हे अडाणी, अशिक्षीत असल्याने व त्यांना ज्ञान नसल्यामूळे व जुनी कागदपत्रे वेळेत मिळाली नसल्यामूळे त्यांना कैफीयत दाखल करता आली नाही असे कारण नमूद केले आहे. सदर कथनाच्या पृष्ट्यार्थ त्यांनी नि.क्र. ३४ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांच्या अर्जात नमूद असलेले कारण तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी त्यांना दाव्यास कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे हे न्यायाचे ठरेल. जर प्रतिवादी यांना झालेला विलंब माफ करुन त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. परंतू प्रतिवादी यांनी मुदतीत कैफीयत दाखल न केल्यामुळे वादींना विनाकारण विलंब व मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे, सदरची बाब प्रतिवादी यांच्यावर खर्चाचे आदेश पारीत करुन प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो,

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ ते ५, १५(ब) व १५(क) यांनी प्रत्येकी रक्कम रुपये ६००/- (रुपये सहाशे फक्त) वादींना खर्च देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३ ते ५, १५(ब) व १५(क) यांनी उपरोक्त नमूद अटीची पुर्तता केल्यानंतर त्यांची कैफीयत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.05.07 13:18:38 +0530

**(एस. एस. साळुंखे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

दिनांक – ०७/०५/२०२६.

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ०७/०५/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | ०७/०५/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | ०७/०५/२०२६ |